एमटीएनएल भवन, ३रा मजला, स्ट्रॅण्ड रोड, अपोलो बंदर, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई - ४००००५.
मूळ अर्ज क्र. ८५३ सन २०२३

नि.: १२
बँक ऑफ बडोदा ....**अर्जदार**
विरुद्ध
मे. हाय ग्राऊंड एंटरप्रायजेस लि. ....**प्रतिवादी**

समन्स

ज्याअर्थी, वरील नमूद ओ. ए. क्र. ८५३ सन २०२३ सन्माननीय पीठासिन अधिकाऱ्यांसमोर २३.११.२०२३ रोजी सूचीबद्ध केला होता.
ज्याअर्थी, सन्माननीय न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन रु. ९७,६०,८९,६१६.३७ च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली. (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज).
ज्याअर्थी साधारण स्वरुपात समन्सची बजावणी परिणामकारक झालेली नाही आणि ज्याअर्थी सन्माननिय न्यायाधिकरणाद्वारे पर्यायी बजावणीकरिता अर्ज संमत करण्यात आला आहे.
ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.
(i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या ३० (तीस) दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;
(ii) मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;
(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.
(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.
(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.
(vi) तुम्हाला सदर डीआरटी ॥ व्यक्तिशः वा वकिलाद्वारे लेखी विवरणपत्र/म्हणणे दाखल करण्यासाठी आणि विनंतीप्रमाणे अनुतोष का मंजूर करु नये याची कारणे दर्शविण्यासाठी १३/१२/२०२४ रोजी स. ११.०० उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत.
नोंद घ्यावी की, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.
माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या ६ सप्टेंबर, २०२४ रोजी दिले.

सही/-
प्रबंधक
डीआरटी- ॥, मुंबई

प्रतिवादींचे नाव आणि पत्ता.
प्रति,
४. श्री. जीवन जे. कदम (हमीदार आणि गहाणवटदार) डाले बांगला हॉटेल, जीवनधारा, शेलागाव, सोलापूर ४१३४०१
५. हाय ग्राऊंड प्रोडक्शन्स प्रा. लि. (कॉर्पोरेट हमीदार) युनिट क्र. २, २रा मजला, ''ओम हिरा पन्ना'', स. क्र. ४१(भाग), ओशिवरा गाव, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई- ४०० ०५३.
६. पिक्चर थॉट प्रा. लि. (कॉर्पोरेट हमीदार) कार्यालय क्र. २, २रा मजला, ओम हिरा पन्ना मॉल, स. क्र. ४१(भाग), ओशिवरा गाव, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई- ४०० ०५३.
७. डेबटोन कॉर्पोरेट ॲडव्हायझरी प्रा. लि. (कॉर्पोरेट हमीदार) ४०४, ४था मजला, कावेरी कॉम्प्लेक्स, हॉलिडे इन च्या मागे, जगन्नाथ मंदिर रोड, साकीनाका, मुंबई ४०००७२.

जाहीर सूचना

तमाम जनतेस सूचना याद्वारे देण्यात येते कि, माझे अशील म्हणजेच (१) श्री. प्रितेश रमेश सावला आणि (२) श्रीम. चंचल रमेश सावला हे गुप्ता कंपाऊंड, व्ही. पी. रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई - ४०० ०८० येथे स्थित हेम रेषा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. (नोंदणी क्र. बीओएम / एचएसजी / ५२४० दिनांक ०२/११/१९७७) (यानंतर सदर सोसायटी अशी उल्लेखित) च्या हेम रेषा अशा ज्ञात इमारतीच्या बी - विंगमधील तळ मजल्यावर स्थित फ्लॅट क्र. बी-२० धारक निवासी परिसर (यानंतर सदर परिसर असे उल्लेखित) एकत्रित सह शेअर प्रमाणपत्र क्र. ०२२ मध्ये विधिसंपादित विभिन्न क्र. १०६ ते ११० (दोन्ही एकत्रित) धारक सदर सोसायटीच्या प्रत्येकी रु. ५०/- च्या पूर्ण भरणा शेअर्स (यानंतर सदर शेअर्स असे उल्लेखित) चे मालक आहेत. सदर परिसरांच्या संदर्भात उपलब्ध असलेली दस्तावेजांची शृंखला आहे (१) श्रीम. सरस्वती एन. राव आणि श्रीम. झनेरबेन एच. गाला यांच्यादरम्यान निष्पादित केलेला दिनांक १० ऑगस्ट, १९८१ रोजीचा पहिला करार, (२) श्रीम. झनेरबेन एच. गाळ आणि (१) श्री. रतिलाल उजमशी शाह आणि (२) श्रीम. कांताबेन रतिलाल शाह यांच्यादरम्यान निष्पादित केलेला दिनांक ५ नोव्हेंबर, १९८८ रोजीचा दुसरा करार. सदर श्रीम. कांताबेन रतिलाल शाह यांचे ३ मार्च, १९९६ रोजीस निधन झाले आणि सदर श्री. रतिलाल उजमशी शाह यांचे ४ जुलै, १९९७ रोजीस निधन झाले असून त्यांच्या पश्चात हिंदू सक्सेशन ॲक्ट, १९५६ जो त्यांच्या मृत्यूच्या वेळी संचालित होता त्याच्या तरतुदींनुसार त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार आणि पुढील वंशज म्हणून (१) सौ. वीणा नरेश शाह (लग्नापूर्वीचे: वीणा रतिलाल शाह) (विवाहित मुलगी) आणि (२) सौ. हर्षा अशोक वोरा (लग्नापूर्वीचे: हर्षा रतिलाल शाह) (विवाहित मुलगी) ह्या आहेत. सदर (१) श्री. रतिलाल उजमशी शाह आणि (२) श्रीम. कांताबेन रतिलाल शाह यांनी त्यांच्या जीवनकाळात त्यांचे नामनिर्देशक म्हणून त्यांच्या मुली म्हणजेच (१) सौ. वीणा नरेश शाह (लग्नापूर्वीचे: वीणा रतिलाल शाह) आणि (२) सौ. हर्षा अशोक वोरा (लग्नापूर्वीचे: हर्षा रतिलाल शाह) यांना नामनिर्देशित केले होते, (३) तिसरा करार म्हणजेच सौ. वीणा नरेश शाह यांच्या नावातील (१) स्वर्गीय श्री. रतिलाल उजमशी शाह आणि (२) स्वर्गीय श्रीम. कांताबेन रतिलाल शाह यांच्या उत्तराधिकारातील सदर परिसरांमधील त्यांच्या ५०% अविभाजित शेअर, हक्क, नामाधिकार आणि हितसंबंधांच्या संदर्भात सौ. हर्षा अशोक वोरा यांच्याद्वारे निष्पादित दिनांक १२ ऑक्टोबर, १९९७ रोजीचे प्रतिज्ञापत्र, (४) चौथा करार म्हणजेच सौ. वीणा नरेश शाह आणि (१) श्री. कमलेश लक्ष्मीदास मांगे आणि (२) सौ. देवी कमलेश मांगे यांच्यादरम्यान निष्पादित केलेला दिनांक २७ फेब्रुवारी, १९९८ रोजीचा विक्री करार आणि (५) पाचवा करार म्हणजेच (१) श्री. कमलेश लक्ष्मीदास मांगे आणि (२) सौ. देवी कमलेश मांगे आणि (१) श्री. प्रितेश रमेश सावला आणि (२) श्रीम. चंचल रमेश सावला यांच्यादरम्यान निष्पादित केलेला दिनांक १४ सप्टेंबर, २००७ रोजीचा विक्री करार. सदर परिसरांच्या संदर्भातील सदर पहिल्या कराराच्या आधी निष्पादित सर्व मूळ करार/कागदपत्रे / विलेख / दस्तावेज हे हरवले / गहाळ झाले आहेत आणि अथक शोधानंतरही सापडण्यासारखे नाहीत. माझ्या अशिलांकडे त्यांच्या रेकॉर्ड्समध्ये सदर परिसरांच्या संदर्भातील सदर पहिल्या कराराच्या पूर्वी निष्पादित सर्व आणि/किंवा कोणतेही करार / पेपर्स / विलेख / दस्तावेज यांच्या फोटोकॉपीदेखील नाहीत. जर कोणत्याही व्यक्ती/ बँक/ वित्त संस्था यांच्याकडे सदर परिसरांच्या संदर्भातील सदर पहिल्या कराराच्या आधी निष्पादित सर्व आणि / किंवा कोणतेही मूळ करार / पेपर्स / विलेख / दस्तावेज यांचा ताबा असल्यास किंवा जर कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींना सदर परिसर किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भात (१) स्वर्गीय श्री. रतिलाल उजमशी शाह आणि (२) स्वर्गीय श्रीम. कांताबेन रतिलाल शाह यांच्याद्वारे कोणतेही शेअर आणि हितसंबंध जसे की, विक्री, अदलाबदल, भाड्याने देणे, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, लिव्ह ॲण्ड लायसन्स, मार्गाचा हक्क, सुविधाधिकार, कुळवहिवाट, भोगवटा, अभिहस्तांकन, गहाण, नामाधिकारांमधील पूर्ववर्ती, वारसाहक्क, अंत्यदान, उत्तराधिकारी, बक्षीस, धारणाधिकार, प्रभार, निर्वाह, विश्वस्त, मुळ नामाधिकार विलेखाचा ताबा किंवा कोणतेही भार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा किंवा कोणत्याही अन्य अधिकारी यांचा आदेश किंवा हुकुम, कंत्राटे, गहाण / करार, विकास हक्क किंवा अन्य काही कसल्याही स्वरूपाचे दावे असल्यास तसे मला सदर लिखित कागदोपत्री पूराव्यासह माझ्या खालील नमुद पत्त्यावर या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे. कसूर केल्यास, असे समजले जाईल की, तेथे सदर परिसरांच्या संदर्भामध्ये तसे दावे किंवा मागणी ह्यात नाहीत आणि तशा व्यक्तींचे दावे किंवा मागणी जर असल्यास ते सर्व इच्छा आणि हेतुनुसार त्यागित आणि परित्यागित समजले जातील आणि सदर परिसरांचे नामाधिकार स्पष्ट, पणनयोग्य आणि सर्व भारांपासून मुक्त समजले जातील.
मुंबई, सदर दिनांक २६ सप्टेंबर, २०२४.

सही/-
विकास ठक्कर
वकील उच्च न्यायालय
४०१/४०२, साईनाथ हाऊस, बी. पी. एस. क्रॉस रोड क्र. १, शेरॉन स्कूल जवळ, मुलुंड (पश्चिम), मुंबई - ४०० ०८०.

ॲक्सिस बँक लि.

शाखा : गिगाप्लेक्स, एनपीसी-१, ३ रा मजला, मुगलसन रोड, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, नवी मुंबई-४०० ७०८
नोंदणीकृत कार्यालय : त्रिशूल, ३रा मजला, समर्थेश्वर मंदिरासमोर, लॉ गार्डन एलिस ब्रिजजवळ, अहमदाबाद ३८०००६

[रुल ८(१)] ताबा नोटीस (स्थावर मालमत्तेकरीता)

ज्याअर्थी खाली सही करणार **ॲक्सिस बँक लि.**(पूर्वीची यूटीआय बँक लिमिटेड) चे अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार/गहाणदार **१) श्री. राकेश मधुकर गायकर (कर्जदार/गहाणदार), २) सौ. रिया राकेश गायकर (सह-कर्जदार/गहाणदार/जामीनदार/कुलमुखत्यारपत्रधारक)** यांना **दि. ०३/०२/२०२३** रोजी **मागणी नोटीस** बजावली होती की त्यांनी सदर नोटीसीत नमूद केलेली बँकेला **दि. ३१/०१/२०२३ रोजी** येणे असलेली रक्कम **रु.१४,१७,२१९/- (रुपये चौदा लाख सतरा हजार दोनशे एकोणीस फक्त) तसेच त्यावरील करारानुसार होणारे व्याज अधिक सर्व किंमत, आकार व सदर रक्कम परत करेपर्यंतचा खर्च** अशी सर्व रक्कम सदर नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.
कर्जदार/सह-कर्जदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, कर्जदार / सह-कर्जदार / गहाणदार तसेच सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) आणि सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या रूल ६ व ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा **दि. २३/०९/२०२४ रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.**
विशेषत: कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार, तसेच सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **ॲक्सिस बँक लि.** यांना **दि. ३१/०१/२०२३** रोजी येणे असलेली रक्कम **रु.१४,१७,२१९/- (रुपये चौदा लाख सतरा हजार दोनशे एकोणीस फक्त) तसेच त्यावरील करारानुसार होणारे व्याज अधिक सर्व किंमत, आकार व सदर रक्कम परत करेपर्यंतचा खर्च** अशा सर्व रकमेच्या अधीन राहील.
सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सरफेसी ॲक्ट २००२ च्या सब सेक्शन(८) सेक्शन १३ अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

मालमत्तेचे परिशिष्ट

फ्लॅट नं. १-४०६, ४ था मजला, आयव्ही बिल्डींग या नावाने ओळखली जाणारी, लब्धी गार्डन्स् प्रोजेक्ट, स. नं. ८१, एच नं. १, २, ३, दहिवली तर्फ वरेडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड ४१०१०१. चटई क्षेत्रफळ २६.९४ चौ. मी.

दिनांक : २५/०९/२०२४ **अधिकृत अधिकारी,**
स्थळ : मुंबई **ॲक्सिस बँक लि.**

पिफिनिटी मुव्हीज प्रायव्हेट लिमिटेडच्या स्वारस्याच्या अभिव्यक्तीकरिता आमंत्रणाच्या मुदतवाढीची सूचना

मे. फिफिनिटी मुव्हीज प्रा. लि. च्या प्रकरणात स्वारस्याच्या अभिव्यक्तीकरिता आमंत्रणाच्या १० सप्टे., २०२४ च्या संदर्भात, स्वारस्याची अभिव्यक्ती सादर करण्याची अंतिम तारीख २५ सप्टें., २०२४ होती.
याद्वारे कळविण्यात येते की, स्वारस्याची अभिव्यक्ती सादर करण्याची अंतिम तारीख ३ ऑक्टो. २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे.
पुढील तारखा आणि पात्रता निकष येथे मिळविता येतील:
वेबसाईट : www.t-ipe.com येथे किंवा
ई-मेल cirp.pmpl@gmail.com / jain_cp@yahoo.com द्वारे
दिनांक : २६ सप्टें २०२४
ठिकाण: अहमदाबाद

चंद्र प्रकाश जैन
पूर्ण वेळ संचालक
मे. टु आयपीई प्रा. लि. करिता
मे. पिफिनिटी मुव्हीज प्रा. लि.चे
निराकारण व्यावसायिक
नोंद. क्र.: आयबीबीआय/आयपीई-०१५१/आपीए-१/२०२३-२४/५००५२
डी-५०१, गणेश मेरिडियन, गुजरात हायकोर्टाच्या समोर, एस.जी. रोड, अहमदाबाद-३८००६०

SBM bank एसबीएम बँक (इंडिया) लि.
४था मजला, फ्लीट हाऊस, अंधेरी कुर्ला रोड, गावदेवी, मरोळ नाका, मुंबई-४०००५९, महाराष्ट्र,
फोन: +९१ २२ ६८७४ ४२००, www.sbmbank.co.in
नोंदणी कार्यालय: १०१, रहेजा सेंटर, १ला मजला, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१, भारत

मागणी सूचना

सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यानंतर ॲक्ट असाल उल्लेख)
खालील नमुद कर्जदारांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील नमुद कर्जदारांना पतसुविधेच्या मार्गाने एसबीएम बँक (इंडिया) लिमिटेड (''एसबीएम बँक'') ने वित्त सहाय्य मंजुर केले होते. सदर वित्त सहाय्य हे खालील नमुद मिळकतींचे नामाधिकार विलेख जमा करुन समतुल्य गहाणाच्या मार्गाने इतर बाबींसह सुरक्षित आहे. कर्जदारांनी बँकेसह निष्पादित कर्ज करारानुसार सदर वित्त सहाय्याचा परतावा करण्यास कसूर केल्यामुळे कर्जदारांचे खाते हे वेळोवेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) द्वारे जारी मार्गदर्शक तत्त्वानुसार एसबीएम बँकेच्या पुस्तकात नॉन परफॉर्मिंग ॲसेट (एनपीए) म्हणुन वर्गीकृत करण्यात आले आहे. आवश्यक सूचना ही ''रजिस्टर्ड पोस्ट विथ ॲकनॉलेजमेंट ड्यू'' द्वारे कर्जदारांच्या संबंधित पत्त्यावर सरफैसी ॲक्टच्या कलम १३(२) अंतर्गत **एसबीएम बँकेने** जारी/बजावणी केली होती, जी कर्जदारांच्या योग्य सहीशिवाय परत आली होती. वरील पार्श्वभूमीवर सदर जाहीर सूचना ही सरफैसी रुल्सच्या नियम ३(१) साठी परंतुकांच्या अनुपालनात जारी करण्यात येत आहे. कृपया नोंद घ्यावी की, तुम्ही एसबीएम बँकेच्या पूर्व लेखी सहमतीशिवाय कोणतीही तारण मत्ता हस्तांतर किंवा अन्यथा (तुमच्या कामकाजाचा सर्वसाधारण भाग वगळुन) करु शकत नाही, कसूर केल्यास तुम्ही सरफैसी ॲक्टच्या कलम २९ अंतर्गत दंडात्मक गुन्ह्यासाठी जबाबदार रहाल. कर्जदारांचे लक्ष तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात ॲक्टच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे. अशा परिस्थितीत कर्जदारांना सदर तारखेपासून ६० दिवसात सदर रक्कम चुकती करण्यासाठी पुन्हा एकदा विनंती करण्यात येत आहे, कसूर केल्यास तारण धनको म्हणुन एसबीएम बँक तिच्या थकबाकीच्या वसुलीकरिता सरफैसी ॲक्टच्या तरतुदींच्या अंतर्गत तसेच कोणत्याही अन्य कायद्याच्या अंतर्गत सुध्दा तिच्या तारण हितसंबंधाची सक्तवसुली करण्यासाठी हक्कदार राहील.

संदर्भ: खाते क्र. २००१२३१२९१२३५७ **मागणी सूचना: ३०.०७.२०२४**
कर्जाचा हेतू: एचएलएलए **एनपीए तारीख : ०९.०७.२०२४**
कर्जदारांचे नाव आणि पत्ता: मे. ग्रोफिल्ड ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. डी४२, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, सानपाडा गाव, नवी मुंबई, मुंबई उपनगर, महाराष्ट्र, भारत ४००७०५०. **२. श्री. त्रिज मोहन आर्य,** फ्लॅट क्र. ८०१, राज ग्रॅण्ड्युअर, डॉ. एल एच हिरानंदानी हॉस्पिटल मागे, आआयटी मुंबई, महाराष्ट्र, भारत ४०००७६. **३. श्री. हर्षद एन. शाह,** ४०१, सिल्व्हर सॉलिटेअर, टिळक रोड, घाटकोपर पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत ४०००७७.
एकूण थकबाकी: २५.०७.२०२४ रोजीस रु. ४,८७,०८,२९७.८८/- (रुपये चार कोटी सत्त्याऐंशी लाख आठ हजार दोनशे सत्याण्णव आणि पैसे अठ्ठ्याऐंशी मात्र), + २६.०८.२०२४ पासूनचे त्यावरील प्रयोज्य व्याज अधिक त्यावरील अनुषंगिक खर्च, प्रभार आणि परिव्यय (वजा काहि असल्यास कर्जदारांनी केलेले पुढील प्रदान).
मिळकतीचे वर्णन : परिशिष्ट 'ए': एकूण मिळकत: युनिट क्र. ६०१, ६वा मजला, ब्रह्मस बिझनेस पार्क, प्लॉट क्र. १६-ए, महाल इस्टेट, महाकाली गुंफा रोड, गाव मुळगाव, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३.
ठिकाण: मुंबई **सही/- प्राधिकृत अधिकारी**
दिनांक : २६.०९.२०२४ **एसबीएम बँक (इंडिया) लिमिटेड**

आवास फायनान्शियर्स लिमिटेड

(सीआयएन: एल६५९२२आरजे२०११पीएलसी०३४२९७)
नोंद. आणि कॉर्पोरेट कार्यालय : २०१-२०२, २रा मजला, साऊथ एंड स्क्वेअर, मानसरोवर इंडस्ट्रियल एरिया, जयपूर - ३०२०२०
Aavas FINANCIERS LTD SAPNE AAPKE, SAATH HAMAARA

लिलाव सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८(६) अन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता लिलाव विक्री सूचना.
सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकती या तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा प्रत्यक्ष कब्जा **आवास फायनान्शियर्स लिमिटेड** (पूर्वी एयु हाऊसिंग फायनान्स लिमिटेड अशी ज्ञात) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे त्या ''जे आहे जेथे आहे'', '' जे आहे जसे आहे'' आणि जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहेत. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणकार यांचे नाव	रोजीस थकबाकी	१३(२) मागणी सूचनेची तारीख आणि आणि रक्कम	कब्जाची तारीख	मिळकतीचे वर्णन	मिळकती करिता राखीव किंमत	मिळकती करिता इसारा रक्कम	लिलावाची तारीख आणि वेळ	निविदा सादरीकरण, निविदा उघडणे आणि आवास फायनान्शियर्स लिमिटेड येथे लिलाव
नंदकिशोर रामचंद्र खवले श्रीम. सुरेखा खवले हमीदार - श्री. महेंद्र पांडुरंग धनगर (खाते क्र.) एलएनजीएएल०१२१७-१८००६८००९	रू. २१,३३,१९०.००/- २१ सप्टेंबर, २०२४ रोजीस देय	रू. १३५५१२८/- ५ सप्टेंबर, २०२४ रोजीस देय	१९ मार्च, २०२४	प्लॉट क्र.४२ वेस्ट भाग, गट क्र.३९६, अमळनेर, जळगाव महाराष्ट्र मोजमापित १५०७ चौ.फू	रू. १७३५२८९.२	रू. १७३५२९/-	११.०० वा. ते ०१.०० वा. २८ ऑक्टो., २०२४	विकास पेंट. अंतिम क्र. ११०-११०ए, क्र. २६८०, १ला मजला, बी. जे. मार्केट जवळ, कोंबडी बाजार, जळगाव-४२५००१, महाराष्ट्र-भारत

अटी आणि शर्ती : १) निविदेत भाग घेणाऱ्या व्यक्तींना, वरील कार्यालयात लिलावाच्या तारखेस/त्या वेळी पूर्वी कार्यालयीन वेळेत जयपूर येथे देय **आवास फायनान्शियर्स लिमिटेड**च्या नावातील इसारा अनामत रक्कम (इ.अ.र.) म्हणून राखीव किंमतीच्या १०% ची पे-ऑर्डर/डीडी/ चेक सह मोहोरबंद लिफाफ्यावर ठळकपणे 'मिळकतीचे नावासाठी निविदा प्रस्ताव' असे लिहून कोणत्याही कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपरोक्त शाखा कार्यालयातून प्राप्त केलेल्या व एचएफएल ने पुरवलेल्या निविदा प्रपत्रातील त्यांचा प्रस्ताव जमा करावा लागेल. मोहोरबंद लिफाफ्यांना **आवास फायनान्शियर्स लिमिटेड ("पूर्वी एयू हाऊसिंग फायनान्स लिमिटेड")**च्या उपरोक्त कार्यालयात उपलब्ध इच्छुक पक्षकारांच्या उपस्थितीत उघडण्यात येईल. आवश्यकता भासल्यास, उपलब्ध बोलीदारांमध्ये आपापसात बोली देखील लावण्यात येतील. बोली यशस्वी न ठरवल्यास, इ.अ.र. परत केली जाईल. **२)** यशस्वी बोलीदारांना मत्तेच्या खरेदीपोटी हातोडी आपटल्यावर २४ तासांत किंवा तात्काळ प्रारंभिक जमा म्हणून इ.अ.र. रक्कम समायोजित करून बोली २५% रक्कम जमा करावी लागेल. प्रारंभिक प्रदानापोटी सदर २५% रक्कम जमा करण्यात यशस्वी बोलीदारांनी कसूर केल्यास, जमा केलेली संपूर्ण इ.अ.र. जप्त होईल आणि विक्री किंमतीची उर्वरित रक्कम, सुरक्षित धनकोंकडून विक्री निश्चिती झाल्यानंतर १५/३० दिवसांत जमा केली पाहिजे, अन्यथा, प्रारंभिक रक्कम म्हणून जमा रक्कम जप्त केली जाईल. **३)** कोणतेही कारण न देता कोणतीही बोली स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे किंवा विक्री प्रक्रिया तहकूब करण्याचे/पुढे ढकलण्याचे निर्विवाद अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांना आहेत. जर निविदा जमा करण्याच्या तारखेस किंवा निविदा उघडण्याच्या तारखेस सरकारकडून सुट्टी जाहीर झाली तर, लिलाव पुढील कामाच्या दिवशी घेण्यात येईल. **४)** निरीक्षणासाठी आणि ज्या इच्छुक पक्षकारांना निविदा प्रक्रियेची माहिती जाणून घ्यायची असेल त्यांनी आवास फायनान्शिअर्स लिमिटेड (एयु हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) २०१-२०२, २रा मजला, साऊथ एंड स्क्वेअर, मानसरोवर इंडस्ट्रियल एरिया, जयपूर-३०२०२० येथे किंवा **सादीक अली सिद्दीकी-७०७३४७०४८२** यांना किंवा संबंधित शाखेत कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. **टीप :** उपरोक्त कर्ज खात्याच्या कर्जदार/जामीनदार/गहाणकारांना उपरोल्लेखित तारखेस निविदा आपापसात बोली लावून विक्री करण्याबाबत नियम ९(१)/८(६) अंतर्गतची एक १५/३० दिवसांची सूचना देखील आहे. जर संपूर्ण थकबाकी रकमेची परतफेड झाली नाही तर मिळकतीची विक्री होईल.
ठिकाण: जयपूर दिनांक: २६-०९-२०२४ **प्राधिकृत अधिकारी, आवास फायनान्शियर्स लिमिटेड**

SICOM LIMITED

सिकॉम लि.,

सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, इमारत क्र. ४, गुरू हरगोविंदजी मार्ग, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९३.
दूर. : ०२२-६६५७२७००. **वेबसाइट :** www.sicomindia.com

५८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना व ई-मतदानाची माहिती

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सिकॉम लिमिटेड (''कंपनी'') ची ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') आयोजित करण्याकरिता **६ सप्टेंबर, २०२४** रोजी वितरीत करण्यात आलेल्या एजीएमच्या सूचनेनुसार विहित विषयांवर व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (ओएव्हीएम) च्या माध्यमातून विचारविनिमय करण्यासाठी सोमवार, ३० सप्टेंबर, २०२४ रोजी दु. ३.३० वाजता (भाप्रवे) एजीएम आयोजित करण्यात येणार आहे.
कृपया नोंद घ्यावी की, निगम व्यवहार मंत्रालयाने त्यांचे परिपत्रक क्र. १४/२०२०, १७/२०२०, २०/२०२०, ०२/२०२१ व ०२/२०२२ व ०९/२०२३ अनुक्रमे ०८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल, २०२०, ०५ मे, २०२०, १३ जानेवरी, २०२१ व दि. ०५ मे, २०२२ व ०९ सप्टेंबर, २०२३ (''एमसीए परिपत्रके'') अंतर्गत कंपन्यांना व्हीसी/ओएव्हीएम माध्यमातून एजीएम आयोजित करण्याची तसेच ज्या सभासदांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे नोंदणीकृत असतील अशा सर्व सभासदांना व अन्य पात्र व्यक्तींना वित्तीय वर्ष २०२३-२४ करिताच्या वार्षिक अहवालासमवेत वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना ई-मेलद्वारे पाठवण्याची परवानगी देण्यात आली आहे.

एजीएमची सूचना व पाठवणी
कंपन्या कायदा,२०१३ चे अनुच्छेद १०१ सहवाचन कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ चे नियम १८ अंतर्गत ज्या सभासदांचे ई-मेल पत्ते डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपी)/रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट (आरटीए) /कंपनी यांच्याकडे नोंदवलेले असतील अशा सर्व सभासदांना वरील निर्देशित सूचना व वित्तीय वर्ष २०२३-२४ करिताचा वार्षिक अहवाल (अभिप्र व एकत्रित वित्तीय अहवालासमवेत) आदी दस्तावेज २३ सप्टेंबर, २०२४ रोजी पाठवण्यात आले आहेत. एजीएमच्या सूचनेसमवेत वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाइट www.sicomindia.com वर उपलब्ध आहे. एजीएम आयोजित करणारी सूचना एनएसडीएलची वेबसाइट www.evoting.nsdl.com वरही कंपनीच्या सर्व सभासदांकरिता उपलब्ध असेल. सदर तारखेपश्चात ज्या सभासदांनी कंपनीचे शेअर्स संपादित केले असतील किंवा ज्यांनी आपले ई-मेल पत्ते डीपी/आरटीए/कंपनी यांच्याकडे नोंदवलेले नसतील ते वरील वेबसाइट्सवरून ते प्राप्त करू शकतील तसेच ई-मतदानाच्या तपशिलासमवेत त्यांच्या प्राप्तीकरिता तुमचे डीपी/आरटीए/कंपनी यांना विनंती पाठवू शकतील.

एजीएममध्ये मतदानाचे स्वरूप (परोक्ष ई-मतदान व एजीएममध्ये ई-मतदान)
कंपन्या कायदा, २०१३ चे अनुच्छेद १०८ सहवाचन कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २० यांच्या अनुपालनांतर्गत पुढे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी आपल्या सर्व भागधारकांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सदर सूचनेत विहित सर्व ठरावांवर आपले मत देता येण्याकरिता ई-मतदान सुविधा (परोक्ष ई-मतदान व एजीएममध्ये ई-मतदान) उपलब्ध करून देत आहे.

बालू फोर्ज इंडस्ट्रीज लिमिटेड

सीआयएन: एल२९१००एमएच१९८९पीएलसी२५५९३३
नों.का.: ५०६, ५ वा मजला, इंपिरीयल पॅलेस, ४५ टेली पार्क रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र-४०००६९ दू.क्र.: ८६५५०७५५७८ वेबसाईट: www.baluindustries.com
ई-मेल: compliance@baluindustries.com

३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) च्या सूचनेकरिता शुध्दिपत्र

बालू फोर्ज इंडस्ट्रीज लिमिटेड (कंपनी) च्या सभासदांची एक वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) किंवा अदर ऑडिओ - व्हिज्युअल मिन्स (ओएव्हीएम) मार्फत सोमवार, ३० सप्टेंबर, २०२४ रोजी भाप्रवे स. ११.३० वा. आयोजित करण्याचे ठरले आहे. कंपनी अधिनियम, २०१३ च्या तरतुदी आणि त्या अंतर्गत बनवलेले नियम सहवाचता निगम व्यवहार मंत्रालय आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ने जारी केलेल्या सर्क्युलर्सच्या रितसर अनुपालनांत ०६ सप्टेंबर, २०२४ रोजी कंपनीच्या भागधारकांना एजीएमची सूचना (''एजीएम सूचना'') पाठवली होती. ०६ सप्टेंबर, २०२४ दिनांकित मूळ सूचना दुरुस्त/सुधारित करण्यासाठी हे शुध्दिपत्र जारी करण्यात येत आहे, ज्याद्वारे बाब क्र. ५ मध्ये मांडलेला ठराव निष्फळ मानला गेला आहे आणि त्यानुसार सेबी (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिस्कलोजर रिक्वायरेमंटस) रेग्युलेशन्स, २०१८ च्या तरतुदी आणि कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रयोज्य तरतुदी व त्याअंतर्गत बनवलेले नियम सहवाचता एमसीए सर्क्युलर्सच्या अनुषंगाने एजीएमच्या सूचनेच्या सदर बाब क्र. ५ वरील ई-व्होटींग थांबविण्यात आले आहे.

त्यानुसार, सर्व संबंधित भागधारक, स्टॉक एक्सचेंजेस, डिपॉझिटरीज, रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्स्फर एजंट, ई-व्होटींगसाठी नियुक्त एजन्सीज, अन्य प्राधिकरणे, नियामक आणि अन्य सर्व संबंधित व्यक्ती यांनी कृपया वरील बदलांची नोंद घ्यावी.

हे शुध्दिपत्र स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटस म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या www.nseindia.com वर आणि कंपनीची वेबसाईट www.baluindustries.com/shareholders-information.php वर आणि एनएसडीएलची वेबसाईट www.evoting.nsdl.com वर पाहता येईल.

ह्या शुध्दिपत्राने सुधारलेल्या किंवा वाढ केलेल्या व्यतिरिक्त एजीएम सूचनेच्या अन्य सर्व मजकुरामध्ये कोणतेही बदल नाहीत.

संचालक मंडळाच्या आदेशावरून
बालू फोर्ज इंडस्ट्रीज लिमिटेडसाठी
सही/-
श्री. जसपालसिंग चंडोक
व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष
डीआयएन: ००८१३२१८

दिनांक: २५ सप्टेंबर, २०२४
ठिकाण: मुंबई

आयडीबीआय बँक लिमिटेड

IDBI BANK
दोस्ती पिनॅकल, जीएफ, प्लॉट क्र. ई-७, रोड क्र. २२, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, एमआयडीसी, ठाणे (प), ठाणे पिन: ४००६०४

(नियम ८(१))
कब्जा सूचना
(स्थावर मिळकतीकरीता)

ज्याअर्थी,
निम्नस्वाक्षरीकारांनी आयडीबीआय बँक लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून मागणी सूचना जारी करून खालील कर्जदार यांस सूचनेतील एकूण नमूद रक्कम या रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या ६० दिवसांत करण्यास सांगितले होते. रकमेची परतफेड करण्यास कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा ताबा त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या रुल ८ सहवाचता ॲक्टचे कलम १३ चे उप-कलम (४) अन्वये घेतला आहे. तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत ॲक्टचे कलम १३ चे उप-कलम (८) च्या तरतुदी नुसार कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.
विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा आयडीबीआय बँक लिमिटेडच्या खालील नमुद रक्कम आणि त्यावरील व्याजाच्या भाराअधीन राहील.

कर्जदार/सह-कर्जदार/हमीदार यांचे नाव	१३(२) सूचनेची तारीख	मागणी सूचनेमध्ये दावा केलेली रक्कम (रू.)	सांकेतिक कब्जाची तारीख	मिळकतीचा पत्ता
शशिकांत वसंत म्हात्रे	११.०७.२०२४	२,७७,९१,५२१	२३.०९.२०२४	शॉप क्र.८, तळ मजला, जीवन ज्योती सीएचएसएल, साई ज्योत अपार्टमेंट, सव्हें २१, हिस्सा ४ जी गुप्ते रोड डोंबिवली महाराष्ट्र-४२१२०२
गणेश प्रणेश आंबेकर, प्रणेश बाबुराव आंबेकर, विठ्ठलराव बाबुराव आंबेकर	२८.०६.२०२४	११,९७,३७४/-	२३.०९.२०२४	शॉप क्र.३, तळ मजला, महावीर ज्योत सीएचएसएल गाव गजबंधन पाथर्ली सव्हें क्र.३० मानपाडा रोड डोंबिवली पूर्व ४२१२०१
मंदार सुरेश टोळे आणि शुभांगी सुरेश टोळे	१४.०५.२०२४	३६,०७,८८८/-	२३.०९.२०२४	फ्लॅट क्र.००१, तळ मजला, मैत्री पार्क सीएचएसएल कोपर गाव डोंबिवली पश्चिम ४२१२०२

सही/-
ठिकाण: ठाणे
प्राधिकृत अधिकारी,
दिनांक : २६-०९-२०२४
आयडीबीआय बँक लिमिटेड [.]

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

सारस्वत बँक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)
७४/सी, समाधान बिल्डिंग, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८.
फोन क्र. ८८२८८०५६०९/८६५७०४३७१३/१४/१५

कब्जा सूचना

(सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या नियम ८(१) अन्वये)

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकारांनी **सारस्वत को-ऑप. बँक लि.** चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (ॲक्ट ५४ सन २००२) अन्वये आणि कलम १३ (१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून **कर्जदार/गहाणवटदार: श्री. भौमिक प्रितम प्रोनब, सह-कर्जदार आणि गहाणवटदार : श्रीम. भौमिक शिल्पी प्रितम** यांना सूचनेमध्ये नमूद केलेली **रु. २३,६६,८१४/- (रुपये तेवीस लाख सहासष्ट हजार आठशे चौदा मात्र) ०९.०७.२०२४ रोजीस** अधिक त्यावरील व्याज ही रक्कम सदरहू सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत चुकती करण्यासाठी बोलाविण्याकरिता दिनांक **१०.०७.२०२४** रोजीची मागणी सूचना निर्गमित केलेली आहे.
कर्जदार/सह-कर्जदार/गहाणवटदार/हमीदार यांनी रक्कम चुकती करण्यामध्ये कसूर केलेली आहे म्हणून कर्जदार/गहाणवटदार/हमीदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकर्त्यांनी **२३.०९.२०२४** रोजी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ सहवाचता अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट कलम (४) अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील वर्णन केलेल्या मिळकतीचा **सांकेतिक कब्जा** घेतलेला आहे.
विशेषत: कर्जदार/सह-कर्जदार/गहाणवटदार/हमीदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी खालील मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीवरील कोणताही व्यवहार हा सारस्वत को-ऑप. बँक लि. च्या रु. २३,६६,८१४/- (रुपये तेवीस लाख सहासष्ट हजार आठशे चौदा मात्र) ०९.०७.२०२४ रोजीस अधिक त्यावरील व्याजाच्या अधीन राहील.
कर्जदार/सह-कर्जदार/गहाणवटदार/हमीदारांचे लक्ष तारण मत्ता विमोचित करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात अधिनियमाच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

स्थावर मिळकतीचे वर्णन

फ्लॅट क्र. ए-२०२, २च्या मजल्यावर, ए-विंग, मोजमापित सुमारे ३८.६७ चौ. मीटर्स बिल्ट अप क्षेत्र, ''पूनम ऑरा को-ऑप. हौ. सो. लि.'' अशा ज्ञात इमारतीमध्ये, पद्मावती नगर, बोळिंज, विरार-पश्चिम, पालघर- ४०१ ३०३ येथे स्थित, जमिनीचा सव्हें क्र. ४१७, हिस्सा क्र. १ आणि २, गाव बोळिंज, तालुका वसई, जि. पालघर चे समन्यायी गहाण. **श्री. भौमिक प्रितम प्रोनब, आणि श्रीम. भौमिक शिल्पी प्रितम यांच्या मालकीचे.**

सही/-
दिनांक : २६.०९.२०२४
प्राधिकृत अधिकारी
ठिकाण: पालघर
सारस्वत को-ऑप. बँक लिमिटेड

इंडियन ओव्हरसीज बँक

ठाणे शाखा (००८९)
अर्जुन टॉवर, १ला मजला, गोखले रोड, नौपाडा, ठाणे, पिन-४०० ६०२, महाराष्ट्र.
दू.: ०२२-२५४०८९८९/ ई-मेल: iob0089@iob.in

(जोडपत्र IV)
कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरीता) (नियम ८ (१))

ज्याअर्थी,
निम्नस्वाक्षरीकारांनी इंडियन ओव्हरसीज बँकचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून **दिनांक १८.०४.२०२४ रोजी एक मागणी सूचना** जारी करून कर्जदार **श्री. विठ्ठल शंकरराव घाटे सी/ओ रूम क्र. १७, सोसायटी क्र. २३, आकुर्ली शिवनेरी सीएचएस., म्हाडा रोड क्र. २, कांदिवली लोखंडवाला, मुंबई-४००१०१ आणि मंदाकिनी विठ्ठल घाटे, सी/ओ रूम क्र. १७, सोसायटी क्र. २३, आकुर्ली शिवनेरी सीएचएस., म्हाडा रोड क्र. २, कांदिवली लोखंडवाला, मुंबई-४००१०१** (यानंतर ''हमीदार'' म्हणून संदर्भित) यांना सूचनेतील नमुद रक्कम **रु. ३२,८७,१८४.१६ (रूपये बत्तीस लाख सत्याऐंशी हजार एकशे चौऱ्याऐंशी आणि सोळा पैसे मात्र)** दि. १८.०४.२०२४ रोजीस सह रकमेची परतफेड वसुलीच्या तारखेपर्यंतचे संविदात्मक दराने पुढील व्याज, प्रभार इ. सह सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.
(१) सूचनेत सांगितलेल्या रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी येथे खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा कब्जा त्याला/तिला सदर ॲक्टच्या कलम १३(४) सहवाचता सदर रुल्सच्या नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून ह्या **२३ सप्टेंबर, २०२४** रोजी घेतला.
(२) विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार करू नये आणि मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार इंडियन ओव्हरसीज बँकेच्या रक्कम **रू. ३२,८७,१८४.१६ (रूपये बत्तीस लाख सत्याऐंशी हजार एकशे चौऱ्याऐंशी आणि सोळा पैसे मात्र) दि. १८.०४.२०२४** रोजीस सह त्यावरील सांपार्श्विक दराने मान्य व्याज, प्रभार इ. सह मागणी सूचना जारी केल्यानंतर कोणतीही परतफेड केली असल्यास ती वजा करून येणाऱ्या रकमेसाठी भाराअधीन राहील.
कब्जा घेतावेळेच्या तारखेस थकीत रक्कम **रु. ३४,२७,७३५.१६ (रूपये चौत्तीस लाख सत्तावीस हजार सातशे पस्तीस आणि सोळा पैसे मात्र) दि. २३.०९.२०२४** रोजीस सह देयाच्या तारखेपर्यंत त्यावरील सांपार्श्विक दराने पुढील व्याज, प्रभार इ.
(३) तारण मत्तांचे विमोचन करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संबंधात ॲक्टच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थावर मिळकतींचे वर्णन

नोंदणीकृत जिल्हा मुंबई उपनगर आणि उप जिल्हा कुर्ला मधील गाव: चांदिवली, तालुका कुर्ला आणि जि. मुंबई उपनगर येथे वसलेल्या, असलेल्या आणि स्थित सीटीएस क्र. ११-ए(भा.), ११-ए/१९१ ते ४०२, ११-डी(भा.), १६, १६/१ ते ९२, १९/१ ते २८, २०(भा.), २५(भा.), २५/१ ते ३२ आणि ५०(भा.) धारक जमिनीच्या सर्व ते भाग आणि विभागावरील बांधकामित संघर्ष नगर, चांदिवली फार्म रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०० ०७२ येथे स्थित श्री गगनगिरी २२/बी एसआरए को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. अशा ज्ञात बिल्डिंग क्र. २२/बी मधील ७व्या मजल्यावरील मिळकत फ्लॅट क्र. ७०२, मोज. २२५ चौ.फूट (चटई क्षेत्र) संलग्नित २५.०९ चौ.मीटर्स (बिल्टअप क्षेत्र) चा मुळ नामाधिकार विलेख जमा द्वारे त्यांनतर कळविण्याची सूचना द्वारे समभाग गहाण.

दिनांक: २३.०९.२०२४
ठिकाण: ठाणे
प्राधिकृत अधिकारी
इंडियन ओव्हरसीज बँक

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

खुली ई-निविदा मागविणारी सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने वरिष्ठ क्षेत्रिय अभियंता, कारवार **ireps.gov.in** प्रणालीवर खालील खुल्या निविदा मागविल्या आहेत. **कामाचे नाव:** उडुपी-ठोकुर विभागाच्या किमी 693/000 ते किमी 739/800 दरम्यान शिल्लक स्थानावर (पृथक पॅचेस) सुमारे 13.5 टीकिमी (ट्रॅक किमी) साठी मॅन्युअल पूर्ण ट्रॅक नूतनीकरण (पी) कार्य, ज्यामध्ये 13 पॉईंट्सचे संच बदलणे/इनसर्ट करणे आणि क्रॉसिंग सामील आहे. (**निविदा क्र.** केआर/केडब्ल्यू/ओएल/डब्ल्यू/2024/58-सीबी). **कामाचे मूल्य लाखांमध्ये:** ₹ 594.99 जीएसटी वगळता. **समाप्तीचा दिनांक आणि वेळ:** 17/10/2024 रोजी 15.00 वा.अधिक माहितीसाठी **वरिष्ठ क्षेत्रिय अभियंता, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. कारवार.** ह्यांच्या कार्यालयाशी अधिक माहितीसाठी संपर्क करा. अधिक माहितीसाठी भेट द्या: (**https://www.ireps.gov.in**)

एदरिश्ती मुव्हीज प्रायव्हेट लिमिटेडच्या स्वारस्याच्या अभिव्यक्तीकरिता आमंत्रणाच्या मुदतवाढीची सूचना

मे. एदरिश्ती मुव्हीज प्रा. लि. च्या प्रकरणात स्वारस्याच्या अभिव्यक्तीकरिता आमंत्रणाच्या **१० सप्टे., २०२४** च्या संदर्भात, स्वारस्याची अभिव्यक्ती सादर करण्याची अंतिम तारीख **२५ सप्टें., २०२४** होती. याद्वारे कळविण्यात येते की, स्वारस्याची अभिव्यक्ती सादर करण्याची अंतिम तारीख **३ ऑक्टो. २०२४** पर्यंत वाढविण्यात आली आहे.
पुढील तारखा आणि पात्रता निकष येथे मिळविता येतील:
वेबसाईट : **www.t-ipe.com** येथे किंवा
ई-मेल **cirp.edrishti@gmail.com / jain_cp@yahoo.com** द्वारे

दिनांक : २६ सप्टें २०२४
ठिकाण: अहमदाबाद

चंद्र प्रकाश जैन
पूर्ण वेळ संचालक
मे. टु आयपीई प्रा. लि. करिता
मे. एदरिश्ती मुव्हीज प्रा. लि.चे
निराकारण व्यावसायिक
नोंद. क्र.: आयबीबीआय/आयपीई-०१५१/आपीए-१/२०२३-२४/५००५२
डी-५०१, गणेश मेरिडियन, गुजरात हायकोर्टाच्या समोर, एस.जी. रोड, अहमदाबाद- ३८००६०

ASREC (India) Limited

बिल्डिंग क्र. २, युनिट क्र. २०१-२०२ए आणि २००-२०२बी, तळ मजला, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३.

जोडपत्र-IV-ए -लिलावाकरिता जाहीर सूचना- स्थावर मिळकतीची विक्री
(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) सहवाचता नियम ९ अंतर्गत)

ज्याअर्थी, एएसआरईसी (इंडिया) लि. ही सिक्युरिटायझेशन ॲण्ड ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (यानंतर ''एएसआरईसी'' असा उल्लेख) आणि एएसआईसी-पीएस०४/२०२१-२२ चे ट्रस्टी म्हणुन कार्यरत नव जीवन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सह निष्पादित दिनांक २७.१०.२०२१ रोजीच्या अभिहस्तांकन कराराच्या सुकृताद्वारे कर्जदार खाते नावाची तारण धनको आहे आणि मूळ धनको नव जीवन को-ऑपरेटिव्ह बँक लि. यांचेकडुन त्यातील तारणांसह **मे. श्री. मा कनस्ट्रक्शन कं. (भागीदारी संस्था) आणि तिचे भागीदार/हमीदार/गहाणवटदार श्री. अशोक पी. संगतानी (भागीदार), श्रीम. हेमा अशोक संगतानी (भागीदार), श्री. मनिष अशोक संगतानी (भागीदार), श्री. सुनिल अशोक संगतानी (भागीदार) आणि श्री. सन्मुख जी. मनवानी (हमीदार) सौ. वीणा जे. संगताजी (हमीदार), श्री. केशव के. चंदनानी (हमीदार), श्री. जगदीश चंदनानी (हमीदार) आणि श्री. राकेश गोलानी (हमीदार आणि गहाणवटदार)** यांचे तारण कर्ज संपादित केले आहे.
नव जीवन को-ऑपरेटिव्ह बँक लि. (अभिहस्तांकनकर्ता बँक) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफैसी) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार आणि संयुक्त/सहकर्जदारांवर बजावलेल्या सदर ॲक्टच्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचनेत नमुद नुसार ६० दिवसांच्या विहित कालावधीत नव जीवन को-ऑपरेटिव्ह बँक लि. द्वारे मंजुर केलेल्या अग्रिमांच्या संदर्भात ०१.०५.२०२२ पासून पुढील व्याजासह **३०.०४.२०२२ रोजीसची रु. ४,२४,०८,३७७/- (रुपये चार कोटी चोवीस लाख आठ हजार तीनशे सत्त्याहत्तर मात्र)** ची एकूण थकबाकी रक्कम प्रदान करण्यासाठी त्यांच्या क्षमतेत वरील सदर सर्व कर्जदार/गहाणवटदार/हमीदार यांना बोलाविण्यासाठी सदर ॲक्टच्या कलम १३(२) अन्वये दिनांक ०७.०६.२०२२ रोजीची (०२.०७.२०२२ रोजी पाठवली) मागणी सूचना जारी केली होती.
एकुण थकबाकीचा तपशिल खालीलप्रमाणे:

खात्याचे नाव	सुविधा/ रक्कम
मे. श्री. मा कनस्ट्रक्शन कं. (भागीदारी संस्था) आणि तिचे भागीदार/हमीदार/गहाणवटदार श्री. अशोक पी. संगतानी (भागीदार), श्रीम. हेमा अशोक संगतानी (भागीदार), श्री. मनिष अशोक संगतानी (भागीदार), श्री. सुनिल अशोक संगतानी (भागीदार) आणि श्री. सन्मुख जी. मनवानी (हमीदार) सौ. वीणा जे. संगताजी (हमीदार), श्री. केशव के. चंदनानी (हमीदार), श्री. जगदीश चंदनानी (हमीदार) आणि श्री. राकेश गोलानी (हमीदार आणि गहाणवटदार)	कॅश क्रेडिट मर्यादा खाते क्र. ४३५००२५०२०००९७४८. ३०.०४.२०२२ रोजीस रु. ४,२४,०८,३७७/- सह एकत्रित ०१.०५.२०२२ पासून परिणामांसह त्यावरील द.सा. १३% दराने पुढील व्याज + २% दराने दंड व्याज
थकबाकी रक्कम	**३०.०४.२०२२ रोजीस रु. ४,२४,०८,३७७/-**

कर्जदार, संयुक्त सहकर्जदार/भागीदार/गहाणवटदार यांनी सदर ॲक्टच्या कलम १३(२) अंतर्गत दिनांक ०७.०६.२०२२ रोजीच्या मागणी सूचनेनुसार संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्यात कसूर केली आणि एएसआरईसी (इंडिया) लिमिटेडच्या नावे दिनांक २७.१०.२०२१ रोजीच्या वरील सदर अभिहस्तांकन कराराला अनुसरुन एएसआरईसी (इंडिया) लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कलम १३(४) सहवाचता एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी (इंटरेस्ट) रुल्स, २००२ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सरफैसी ॲक्ट, २००२ च्या कलम १३(४) सहवाचता कलम १४ च्या सुकृताद्वारे खालील नमुद मिळकती म्हणजेच ०३.१०.२०२३ रोजी अ. क्र. १ आणि ०२.१२.२०२२ रोजी अ.क्र. २ चा प्रत्यक्ष कब्जा घेतला आहे.
संपूर्ण थकबाकी पुर्ण न केल्यामुळे सर्वसामान्य आणि विशेषत: कर्जदार, संयुक्त सहकर्जदार/भागीदार/गहाणवटदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, प्राधिकृत अधिकारी याद्वारे सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत सदर सूचनेनंतर प्राप्त झालेले प्रदान रितसर जमा केल्यानंतर कलम १३(२) सूचनेच्या अंतर्गत वरील सदर मागणी सूचनेनुसार खात्यामधील थकबाकीची वसुलीसाठी खालील नमुद तारण मिळकत विकण्यास इच्छुक आहेत आणि म्हणून तारण मिळकतींच्या खरेदीसाठी मोहोरबंद पाकिटातून ई-निविदा/मोहोरबंद लिफाफ्यातुन निविदा/बोली मागवित आहेत.
मिळकतीची विक्री काटेकोरपणे मे. श्री मा कन्स्ट्रक्शन कं. कडुन तारण धनकोंना थकीत ०१.०५.२०२२ पासून त्यावरील पुढील व्याजासह ३०.०४.२०२२ रोजीसची **रु. ४,२४,०८,३७७/- (रुपये चार कोटी चोवीस लाख आठ हजार तीनशे सत्त्याहत्तर मात्र)** च्या एकुण रकमेच्या वसुलीसाठी **''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे''** आणि **''कोणत्याही आधाराशिवाय''** तत्त्वाने करण्यात येईल. राखीव किंमत आणि इअर इ. खालीलप्रमाणे:

अ. क्र.	तारण मत्तेचे वर्णन	राखीव किंमत (रु. लाखात)	इ.अ.र. (रु. लाखात)	बोली वाढविण्याचे मुल्य लाखात (लाखात)
१	श्री. राकेश सेवाराम गोलानी यांच्या नावातील क्षेत्र मोजमापित २५२ चौ. या., वॉर्ड क्र. ४५, खाता क्र. २१९, सर्व्हे क्र. ४५/००२६, महर्षी वाल्मिकी नगर, व्हिटीसी रोड, सेक्शन ३०ए, उल्हासनगर-४२१००४ अंतर्गत निर्धारित सीटीएस क्र. १९५७२/ ३/४ धारक बँरक के. १५०७, खोली क्र. १२-बी. **सीमाबध्द: पूर्व:** मोकळी जागा, **पश्चिम:** मोकळी जागा, **दक्षिण :** मोकळी रस्ता, **उत्तर:** खोली क्र. १२-ए, उल्हासनगर-४२१००४.	१०९.००	१०.९०	००.५०
२	श्री. अशोकलाल पी. संगतानी यांच्या नावातील शिवलोक अपा., सेक्शन १९, उल्हासनगर-४२१००३ अशा ज्ञात इमारतीमधील ५व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ५०३. **सीमाबध्द: पूर्व:** मोकळी जागा, **पश्चिम:** मोकळी जागा, **दक्षिण :** मोकळी रस्ता, **उत्तर:** खोली क्र. १२-ए, उल्हासनगर-४२१००४.	२९.८३	२.९८	०.२५

लिलावाचा तपशिल

मिळकतीचे निरिक्षण:

अ.क्र.	मिळकती	तारीख आणि वेळ
१	वॉर्ड क्र. ४५, खाता क्र. २१९, सर्व्हे क्र. ४५/००२६, महर्षी वाल्मिकी नगर, व्हिटीसी रोड, सेक्शन ३०ए, उल्हासनगर-४२१००४ अंतर्गत निर्धारित सीटीएस क्र. १९५७२/ ३/४ धारक बँरक के. १५०७, खोली क्र. १२-बी.	**०८.१०.२०२४ रोजी दु. १२ ते दु. ३**
२	शिवलोक अपा., सेक्शन १९, उल्हासनगर-४२१००३ अशा ज्ञात इमारतीमधील ५व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ५०३.	**०९.१०.२०२४ रोजी दु. १२ ते दु. ३**

बोली प्रपत्र प्राप्त करणे : २६.०९.२०२४ ते १४.१०.२०२४ रोजी स. १०.०० ते सायं. ५.००
बोली प्रपत्र सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:१५.१०.२०२४ रोजी सायं. ०४.०० पर्यंत.
बोली प्रपत्र प्राप्त करण्याचे/सादर करण्याचे ठिकाण : २०१/२०२ए, बिल्डिंग क्र. २, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पू.), मुंबई-४०००९३ येथील एएसआरईसी (इंडिया) लि. च्या नोंदणीकृत कार्यालयातुन. निविदा प्रपत्र एसआरईसी (इंडिया) लिमिटेडची वेबसाईट (**www.asrecindia.co.in**) वरुन सुध्दा डाऊनलोड करण्यात येतील.
लिलाव बोली उघडण्याचे ठिकाण: एएसआरईसी ला प्राप्त झालेले प्रस्ताव/निविदा **१६.१०.२०२४ रोजी स. ११.०० वा.** आमच्या वरील नमुद कार्यालयाच्या पत्त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे उघडण्यात येतील.

अटी आणि शर्ती:

१. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दिलेले तपशिल हे त्यांचे चांगले ज्ञान आणि माहितीनुसार तेथे मिळकतीवरील कोणताही इतर भार प्राधिकृत अधिकाऱ्यांना माहित नाही. तथापी इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मिळकतीला बाधक दावे/हक्क/थकबाकी आणि लिलावासाठी ठेवलेल्या मिळकतीचे नामाधिकार, बोजा संदर्भात त्यांची स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक आहे. ई-लिलावाची जाहिरात ही काही घटक नाही आणि एएसआरईसी चे कोणतेही सादरीकरण किंवा कोणतेही वचन मानण्यात येऊ नये. मिळकत एएसआरईसी ला ज्ञात किंवा अज्ञात विद्यमान बोजासह विकण्यात येईल. प्राधिकृत अधिकारी/तारण धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/हक्क/मतांकरिता जबाबदार राहणार नाही.
२. ई-लिलाव हा ''जे आहे जेथे आहे'', जे आहे जसे आहे'' आणि जे काही आहे'' आणि विना अवलंब तत्वाने'' वरील नमुद नुसार संपूर्ण मिळकतीसाठी करण्यात येणार आहे.
३. निविदा दस्तावेजांमध्ये दिलेल्या विहित स्वरुपातील बोली या एएसआरईसी (इंडिया) लि. चे प्राधिकृत अधिकारी, बिल्डिंग क्र. २, युनिट क्र. २०१-२०२ए आणि २००-२०२बी, तळमजला, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३ यांचेकडे किंवा **harshad@asrecindia.co.in/ ankita@asrecindia.co.in** कडे ईमेल मार्फत सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणामुळे **१५.१०.२०२४ रोजी सायं. ४.००** नंतर प्राप्त झालेले बोली प्रपत्र किंवा इअर विचारात घेतली जाणार नाही. इअरशिवाय बोली तडकाफडकी नाकारण्यात येईल.
४. यशस्वी बोलीदारांची इसारा अनामत रक्कम (इअर) ही विक्री मोबदल्याचा भाग म्हणुन राखुन ठेवण्यात येईल. आणि अयशस्वी बोलीदारांची इअर त्याच पध्दतीने परत करण्यात येईल. इअरवर व्याज देय नाही. बोलीदारांना त्वरित सुविधा आणि योग्य परताव्याकरिता त्यांच्या बँक खात्याचा तपशिल देण्याची विनंती करण्यात येत आहे.
५. यशस्वी बोलीदारांनी त्वरित म्हणजेच त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसाच्या अगोदर विक्री किंमतीची २५% रक्कम (जमा केलेली इअर रक्कम धरून) प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे जमा केली पाहिजे आणि असे जमा करण्यात कसूर केल्यास इअर जप्त करण्यात येईल आणि मिळकतीची पुन्हा विक्री करण्यात येईल.
६. विक्री किंमतीच्या उर्वरित ७५% रक्कम मिळकतीच्या विक्री निश्चितीच्या १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी किंवा तारण धनको व यशस्वी बोलीदार यांच्यात लेखी मान्य केल्या जाणाऱ्या वाढीव मुदतीत प्रदान करावी लागेल. वरील विहित कालावधीत प्रदानात कसूर केल्यास जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि मिळकतीची पुन्हा विक्री करण्यात येईल आणि कसूरवार खरेदीदाराला मिळकत किंवा त